Estd: 1962
NAAC "A" Grade

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004 MAHARASHTRA**
**Colleges and University Development Section**
PHONE :EPABX-2609000, 2609145
□ FAX :0091-231-2691533 & 0091-231-2692333
Website : www.unishivaji.ac.in E-mail: stats@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४ महाराष्ट्र(महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग)**
**दुरध्वनी: (ईपीएबीएक्स) २६०९०००, २६०९१४५**
**□ फॅक्स: ००९१-२३१-२६९१५३३,२६९२३३३,२६९३२९४**

जा.क्र. एस.यु/म.व.वि.वि.विभाग/ ९०८ दिनांक : 30 NOV 2018

**प्रति,**
**मा. विभागप्रमुख / समन्वयक / संचालक,**
सर्व अधिविभाग / केंद्रे
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**विषय: शिष्यवृत्तीधारक संशोधक विद्यार्थ्यांच्या सातत्य प्रमाणपत्र व घरभाडे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे युजीसीच्या वेब पोर्टलवर नोंदविण्याबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे जा.क्र.एस.यु./म.वि.वि.विभाग/८७२, दि. १९/११/२०१८ चे परिपत्रक.**

महोदय / महोदया,

विविध वित्तीय संस्थेकडून संशोधक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती / अधिछात्रवृत्ती मंजूर होत असते. सदर शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने ते आपल्या अधिविभागामध्ये हजर होतात. सदर शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने आवश्यक असणारे सातत्य प्रमाणत्र व घरभाडे प्रमाणपत्र हे युजीसीच्या वेब पोर्टलवर नोंदविल्यानंतर विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परस्पर त्यांच्या बँक खात्यावर जमा होते. यानुषंगाने दर तीन महिन्यातील सदरची प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य होते. तथापि, युजीसीच्या दि. १०/१०/२०१८ रोजीच्या परिपत्रकातील नियमानुसार सदर शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची नमुद कागदपत्रे ही प्रत्येक महिन्यास संबंधीत पोर्टलवर नोंदविण्याविषयी सुचित केले आहे.

तरी, उपरोक्त बाबी विचारात घेता यु.जी.सी. बेब पोर्टलच्या Monthly Payment Confirmation अंतर्गत शिष्यवृत्ती घेत असलेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी जुन्या नियमानुसार माहे ऑक्टोबर, २०१८ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीमधील सातत्य प्रमाणपत्र (Continuation Certificate) व घर भाडेभत्ता प्रमाणपत्र (HRA Certificate) एकत्रितपणे दि. १० डिसेंबर,२०१८ पूर्वी तसेच माहे जानेवारी, २०१९ पासूनचे सदरची कागदपत्रे त्या-त्या महिन्याच्या १० तारखेपूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विहीत नमुन्यात व उपरोक्त संदर्भीय परिपत्रकातील जोडलेल्या विहीत नमुन्यात मा. विभागप्रमुखांच्या मंजूरीसह सादर करावेत जेणेकरुन पुढील योग्य ती कार्यवाही करणे सोईचे होईल.तसेच यु.जी.सी.च्या दि. १०/१०/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांनी सदर वेब पोर्टलवर स्वत:च्या लॉगीन आय.डी. द्वारे ज्या बाबींविषयी कार्यवाही करावयाची आहे त्या नियमीतपणे व काळजीपूर्वक कराव्यात.

कळावे,

आपला विश्वासू,

**उपकुलसचिव**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सोबत: वरील प्रमाणे.

- युजीसीचे दि. १०/१०/२०१८ रोजीचे परिपत्रक